तात्काळ/महत्वाचे

मंत्रालय येथे कार्यरत असलेलया महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील गट "अ" व गट"ब" संवर्गातील अधिकाऱ्यांचे महापार प्रणालीमधील कार्यमुल्यमापन अहवालाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय लेखा व कोषागारे**

तळ मजला, कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई. ४०००२०
दूरध्वनी क्र.- ०२२-२२८८०१०६ ईमेल- aaomahapardat.mu-mh@mah.gov.in

---

**वाचा :** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०२.०२.२०१७.
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२१७/प्र.क्र.१३१/तेरा,दि.१५.१२.२०१७.
३. संचालनालाचे परिपत्रक क्र.संलेको १२.२०१७/गोअकक्ष/स.अ.२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/४७७, दि.१९.१२.२०१७.
४. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि.०७.०२.२०१८.
५. संचालनालाचे परिपत्रक क्र.संलेको ०५.२०१८/गोअकक्ष/स.अ.२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/७८, दि.१६.०४.२०१८.
६. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएफआर/१२२४/प्र.क्र.१६४/आस्थामं (१३), दि. १९.०३.२०२५

***

क्र.संलेको ०४.२०२५/क.ले.३/महापार परिपत्रक/गोअक/216 दि. 24/04/2025

## परिपत्रक

महापार प्रणालीमध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या "गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यात येतात.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची कार्यमूल्यमापन अहवालाकरिता परिशिष्ट "अ" ची (आस्थापना विषयक) माहिती महापार प्रणालीमध्ये ऑनलाईन

भरून संबंधित अधिकाऱ्यांच्या Login ID वर पाठविण्याची जबाबदारी संचालनालयाच्या संदर्भ क्र. ५ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कार्यालयांना देण्यात आली आहे.

मंत्रालयामध्ये कार्यरत असलेलया महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या"गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी यांची परिशिष्ट "अ" ची (आस्थापना विषयक) संबंधित संस्करण/ आस्थापना अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह प्राप्त झालेली माहिती महापार प्रणालीमध्ये ऑनलाईन भरून संबंधित अधिकारी यांच्या login आयडीवर पाठविण्याची जबाबदारी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास देण्यात आलेली आहे.

तरी, मंत्रालय येथे कार्यरत असलेल्या सर्व महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या "गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांनी त्यांची परिशिष्ट अ ची (आस्थापना विषयक) माहिती संबंधित संस्करण/ आस्थापना अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह संचालनालयास दि. ३०.०४.२०२५ पूर्वी पाठविण्यात यावी. तद्‌नंतर प्राप्त झालेली परिशिष्ट अ ची (आस्थापना विषयक) माहिती विचारात घेण्यात येणार नाही व त्याची जबाबदारी संबंधित कार्यालयातील संस्करण अधिकारी व संबंधित अधिकारी यांची राहील.

तसेच, प्रत्येक प्रतिवेदन वर्षात कार्यमुल्यमापन अहवालाबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी, जेणेकरून संबंधित अधिकारी यांचे महापार प्रणालीमधील कार्यमुल्यमापन अहवाल विहित कालमर्यादेत तयार होतील.

सदर परिपत्रक महाकोषवर प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
संचालनालय लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

D:\महापार परिपत्रके\२०२५\महापार परिपत्रक workflow २०२५.docx